StudySite.org StudySite.org

महाराष्ट्र शासन – जलसंपदा विभाग
पुणे प्रादेशिक निवड समिती, पुणे
गट-क मधील सरळसेवा भरती परीक्षा सन 2011

| प्रश्नपत्रिकेचा कोड |
|---|
| A |

# वाहन चालक पदासाठी प्रश्नपत्रिका

| आसन क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

**दिनांक :** 26/02/2012 **वेळ :** 11.00 ते 13.00 **एकूण गुण :** 150

**सूचना :**
1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) विशिष्ठ क्रमांक छापलेली उत्तरपत्रिका स्वतंत्रपणे पुरविणेत येईल.
3) प्रत्येक प्रश्नाला 2 गूण आहेत. एकूण 75 प्रश्न.
4) प्रश्न पत्रिकेतील सर्व अंक इंग्रजीत आहेत.

## लेखी परीक्षा

खालील उतारा वाचून त्यावरील 1 ते 5 प्रश्नांची उत्तरे द्या.

: उत्सव आपल्याला आवडतात. कारण ते आपल्या रोजच्या रुक्ष जीवनातून अल्पकालीन मुक्ती देतात. धंदा, रोजगार व शुष्क जीवन व्यवहार यांच्या ओझ्याखाली दबलेला मानव उत्सवाच्या दिवशी थोडा मुक्त श्वास घेतो.

उत्सवामागे भावाचे महत्व आहे. संक्रातीचा उत्सव खरी संघनिष्ठा शिकवून सम्यक् क्रांती निर्माण करण्याचा संदेश देतो. होळी आपल्याला राग, द्वेष, उच्च-नीच हे भेद जाळून टाकण्याचा संदेश देते. दिवाळी आपल्याला दीक्षा घेऊन जीवन उन्नत बनविण्याचा संदेश देते. गणेश चतुर्थी ही गणप्रमुख कसा असला पाहिजे ते समजावते. उत्सव ऐक्याचे साधक, प्रेमाचे पोषक, प्रसन्नतेचे प्रेरक, धर्माचे संरक्षक आणि भावनांचे संवर्धक आहेत. आपले उत्सव आपण खऱ्या अर्थाने समजून घेतले, उपयोगात आणले, संस्कारी ठेवले तरच ते उत्सव साजरे करण्याला काही अर्थ आहे.

प्रश्न क्र. 1 : उत्सव माणसाला का आवडतात ?
: (A) नवे कपडे घालायला मिळतात. (B) मौजमजा करता येते.
(C) रोजच्या रुक्ष जीवनातून मुक्ती मिळते. (D) पैसे मिळतात.

प्रश्न क्र. 2 : वरील उताऱ्यातील 'भावाचे' या शब्दाचा अर्थ काय?
: (A) बहिणीचे नाही भावाचे (B) मित्राचे
(C) भक्तीचे (D) स्वर्गाचे



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र. 3 : होळी कोणता संदेश देते ?

: (A) पुरणपोळी करण्याचा (B) खूप आरडाओरडा करण्याचा.

(C) होळी पेटविण्याचा (D) भेद जाळून टाकण्याचा.

प्रश्न क्र. 4 : धर्माचे संरक्षक कोण आहेत?

: (A) धर्मगुरु (B) गुरु

(C) उत्सव (D) दीक्षा

प्रश्न क्र. 5 : 'रुक्ष' शब्दाचा योग्य विरुध्दार्थी शब्द कोणता ?

: (A) कोरडा (B) ओलसर

(C) आल्हाददायक (D) आरामदायक

प्रश्न क्र. 6 : 'ब' हा 'अ' ला म्हणाला की तुझी आई माझ्या आईची सून आहे. तर 'ब' ची मुलगी 'अ' च्या भावाची कोण ?

: (A) भाची (B) आत्या

(C) बहीण (D) मावशी

प्रश्न क्र. 7 : 31 मुलींच्या रांगेत लीनाचा डावीकडून 15 वा क्रमांक आहे. तर उजवीकडून मोजल्यास तिचा कितवा क्रमांक येईल?

: (A) 17 (B) 15

(C) 16 (D) 18

प्रश्न क्र. 8 : बोटी थांबण्याच्या व मालाची चढ उतार करण्याच्या सोयीच्या ठिकाणाला .... म्हणतात

: (A) विमानतळ (B) बंदर

(C) रेल्वेस्थानक (D) जंक्शन

प्रश्न क्र. 9 : शिवाजी महाराजांच्या काळात हे संत होऊन गेले ?

: (A) ज्ञानेश्वर व रामदेव (B) नामदेव व तुकाराम

(C) तुकाराम व रामदास (D) एकनाथ व तुकाराम

प्रश्न क्र.10 : खालीलपैकी कोणते पीक खरीप हंगामात घेतले जाते ?

: (A) गहू (B) बाजरी

(C) हरभरा (D) ऊस

प्रश्न क्र.11 : तेलासाठी जी पीके घेतली जातात त्या पिकांना काय म्हणतात

: (A) धान्यपीके (B) खरीप पीके

(C) रब्बी पीके (D) गळीताची धान्य

प्रश्न क्र.12 : महाराष्ट्राचा मोठा भूभाग या खडकापासून बनला आहे ?

: (A) चुनखडी (B) जांबा

(C) दगडी कोळसा (D) बेल्साल्ट

StudySite.org



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र.13 : महाराष्ट्राला किती किलोमीटर लांबीचा सागर किनारा लाभला आहे ?
: (A) 700 (B) 710
(C) 740 (D) 720

प्रश्न क्र.14 : महाराष्ट्राच्या विधान परिषदेच्या सदस्य संख्या किती ?
: (A) 288 (B) 76
(C) 78 (D) 72

प्रश्न क्र.15 : गोदावरी नदी कोठुन उगम पावते?
: (A) महाबळेश्वर (B) सातपुडा
(C) भिमाशंकर (D) त्र्यंबकेश्वर

प्रश्न क्र.16 : माथेरान हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे ?
: (A) रायगड (B) रत्नागिरी
(C) मुंबई (D) ठाणे

प्रश्न क्र.17 : महाराष्ट्रात कोणता पाऊस पडतो ?
: (A) हंगामी (B) उन्हाळी
(C) हिवाळी (D) मोसमी

प्रश्न क्र.18 : खालीलपैकी कोणती नदी अरबी समुद्रास मिळते ?
: (A) ब्रम्हपुत्रा (B) तापी
(C) गंगा (D) कृष्णा

प्रश्न क्र.19 : कोणाच्या गतीशी वर्ष संबंधित आहे ?
: (A) चंद्राच्या (B) सूर्याच्या
(C) चंद्रमालेच्या (D) पृथ्वीच्या

प्रश्न क्र.20 : 1 क्विंटल = ..... किलोग्रॅम
: (A) 50 (B) 10000
(C) 1000 (D) 100

प्रश्न क्र.21 : नकाशातील दिशादर्शक बाण कोणती दिशा दर्शवितो ?
: (A) 'पुर्व' (B) 'पश्चिम'
(C) 'उत्तर' (D) पृथ्वीच्या

प्रश्न क्र.22 : आपत्तीच्या काळात करावयाच्या उपाययोजनांना ....... म्हणतात
: (A) सुरक्षाविषयक नियम (B) नागरिकांची कर्तव्य
(C) आपत्ती व्यवस्थापन (D) पूरनियंत्रण

प्रश्न क्र.23 : खालीलपैकी कोणता वायु प्रदुषण करीत नाही ?
: (A) कार्बन मोनॉक्साईड (B) नायट्रोजन डायऑक्साईड
(C) कार्बन डायऑक्साईड (D) सल्फर डायऑक्साईड



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र.24 : ......... हे शिवरायांचे स्वप्न होते

: (A) राजा होणे (B) प्रजेला सुखी करणे
(C) हिंदवी स्वराज (D) परकीय सत्ता संपविणे

प्रश्न क्र.25 : महाराष्ट्राचा राज्यप्राणी कोणता?

: (A) नाग (B) वाघ
(C) सिंह (D) शेकरू

प्रश्न क्र.26 : पुढीलपैकी कोणते वर्ष हे लीप वर्ष असेल?

: (A) 2014 (B) 2022
(C) 2016 (D) 2030

प्रश्न क्र.27 : 9 पुस्तकांची सरासरी किंमत रु. 25/- आहे. त्यामध्ये दहाव्या पुस्तकांची किंमत मिळवल्यास सरासरी किंमत रु. 28/- होते तर दहाव्या पुस्तकाची किंमत किती ?

: (A) 85 (B) 75
(C) 55 (D) 45

प्रश्न क्र.28 : 15 लिटर तेलापैकी 7500 मि.ली. तेल संपले तर उरलेले तेल किती आहे

: (A) 7500 मि.ली. (B) 750 लि
(C) 750 मि.ली. (D) 7050 लि.

प्रश्न क्र.29 : खालील बेरीज करा

6 तास 40 मिनिटे + 3 तास 25 मिनिटे

: (A) 3 तास 15 मि. (B) 9 तास 5 मि.
(C) 9 तास 65 मि. (D) 10 तास 5 मि.

प्रश्न क्र.30 : 12 मजूर एक काम 20 दिवसात पूर्ण करतात तर तेच काम 15 मजूर किती दिवसात पूर्ण करतील ?

: (A) 18 दिवस (B) 25 दिवस
(C) 15 दिवस (D) 16 दिवस

प्रश्न क्र.31 : एका संख्येला 5 ने भागले असता बाकी 2 उरते व 6 ने भागले असता बाकी 1 उरते तर ती संख्या कोणती

: (A) 30 (B) 32
(C) 35 (D) 37

प्रश्न क्र.32 : एका कारखान्यात दररोज 300 बाहुल्या तयार केल्या जातात. एका वर्षी प्रत्येक चौमाहीत 80 दिवस कारखाना चालू होता तर त्या वर्षी किती बाहुल्या तयार करण्यात आल्या

: (A) 8000 (B) 12000
(C) 24000 (D) 72000



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र.33 : एका कार्यक्रमात 24 खुर्च्यांची एक रांग याप्रमाणे 12 रांगा केल्या त्यामध्ये 188 पाहुणे येऊन बसले तर एकूण किती खुर्च्या रिकाम्या राहिल्या

: (A) 188 (B) 101

(C) 100 (D) 11

प्रश्न क्र.34 : खालीलपैकी कोणत्या संख्येला 3,5 व 7 या सर्वांनी निशेष भाग जातो?

: (A) 120 (B) 105

(C) 90 (D) 140

प्रश्न क्र.35 : संख्या व अवयव यांच्या जोडया दिल्या आहेत, गटात न बसणारी जोडी ओळखा

: (A) 27,9 (B) 35,7

(C) 31,5 (D) 48,8

प्रश्न क्र.36 : 50 पैशाची 60 नाणी देऊन त्या रकमेत 5 रु. किती नाणी येतील ?

: (A) 5 (B) 16

(C) 30 (D) 6

प्रश्न क्र.37 : या वाक्याचा प्रकार ओळखा

सुधाने सुंदर चित्र काढले

: (A) होकारार्थी (B) नकारअर्थी

(C) प्रश्नाअर्थी (D) उद्‌गारअर्थी

खालील व्याकप्रचारांचा अर्थ ओळखा

प्रश्न क्र.38 : कानोसा घेणे म्हणजे

: (A) कान कोरणे (B) चोरुन ऐकणे

(C) अंदाज घेणे (D) हुल देणे

प्रश्न क्र.39 : डोळे पांढरे होणे म्हणजे

: (A) डोळे निवणे (B) डोळे दिपणे

(C) मोठा धक्कादायक प्रसंग निर्माण होणे. (D) डोळे येणे.

प्रश्न क्र.40 : 'निर्झर' शब्दाचा समानार्थी शब्द निवडा

: (A) झरणी (B) झरा

(C) पाणी (D) निर्जन

StudySite.org



StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org

खालील अर्थाची म्हण निवडा

प्रश्न क्र.41 : त्रास सहन केल्याशिवाय मोठेपण मिळत नाही

: (A) पेराल तसे उगवले
(B) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही
(C) प्रयत्नाअंती परमेश्वर
(D) पी हळद हो गोरी

प्रश्न क्र.42 : अनेक गोष्टी एकाच वेळी करण्याचा प्रयत्न केला की एकही नीट होत नाही

: (A) एका हाताने टाळी वाजत नाही
(B) रात्र थोडी सोंगे फार
(C) एक ना धड बाराभर चिंध्या
(D) दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ

खालील शब्दसमुहाबद्दल एक शब्द निवडा

प्रश्न क्र.43 : लोकांचे नेतृत्व करणारा

: (A) लोकमान्य
(B) लोकप्रिय
(C) लोकनायक
(D) लक्षाधीश

प्रश्न क्र.44 : चांदण्या रात्रीचा पंधरवडा

: (A) शुध्दपक्ष
(B) शुक्लपक्ष
(C) कृष्णपक्ष
(D) ए व बी दोन्ही

प्रश्न क्र.45 : तरु ला समानअर्थी शब्द कोणता

: (A) पान
(B) बांबू
(C) अरण्य
(D) झाड

खालील कविता वाचून त्यावरील 46 ते 50 प्रश्नांची उत्तरे द्या.

कोपऱ्यासी गुणगुणत अन् अभंग
उभा केव्हाचा एक तो अपंग
भोवतीचा अंधार जो निमाला
हृदयी त्याच्या जणू जात आश्रयाला ।।1।।
जीभ झालेली ओरडून शोष
चार दिवसांचा त्यातही उपास
नयन थिजले थरथरति हातपाय
रूप दैन्याचे उभे मुर्त काय ? ।।2।।
कीव यावी पण त्याची कुणाला ?
जात उपहासनी पसरला कराला
तोच येई कणी परतुनी मजूर
बघुनि दीना त्या उधाणून ऊर ।।3।।



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org

म्हणे राहिन दिन एक मी उपाशी
परी लाभू दे दोन घास यासी
खिसा ओतुनि तया ओंजळीत
चालू लागे तो दनिबंधू वाट ।।4।।

प्रश्न क्र. 46 : या कवितेत कोणाचे वर्णन केले आहे?

: (A) अपंगाचे (B) भिकाऱ्याचे
(C) अपंग उपाशी भिकाऱ्याचे (D) अपंग भिकाऱ्याचे

प्रश्न क्र. 47 : भिकाऱ्याच हातपाय कां थरथरत होते?

: (A) तो अपंग होता (B) तो चार दिवसांचा उपाशी होता.
(C) तो उभा राहून भीक मागत होता (D) तो दमला होता.

प्रश्न क्र. 48 : ओरडून ओरडून भिकाऱ्याची स्थिती कशी झाली होती?

: (A) त्याचे डोळे थिजले होते (B) त्याच्या जिभेला शोष पडला होता
(C) त्याचे हातपाय थरथरत होते (D) त्याला दैन्यावस्था आली होती

प्रश्न क्र. 49 : भिकाऱ्याचे बघून मजुराने काय केले?

: (A) त्याचा उर भरून आला (B) भिकाऱ्याच्या ओंजळीत खिशातील सर्व पैसे टाकले
(C) त्याने एक दिवस उपाशी राहायचे ठरवले (D) भिकाऱ्याच्या पोटात त्याने दोन घास घातले.

प्रश्न क्र. 50 : दीनबंधु कोणास म्हटले आहे?

: (A) भिकाऱ्यास (B) धनिकास
(C) मजुरास (D) गरिबास

## व्यावसायिक परीक्षा

प्रश्न क्र. 51 : वाहन चालवत असतांना वाहन चालकाने वाहनाचा वेग कमी करत असलेचा संकेत कशा प्रकारे द्यावा ?

:(A) इंडिकेटर व्दारा (B) उजवा हात बाहेर काढून
(C) डिपरव्दारा (D) उजवा हात बाहेर काढुन हात कोपरापासून वर खाली हलवून



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र. 52 : मोटार वाहन अधिनियम 1988 या कायद्यान्वये अतिवेगाने वाहन चालवणे हा कोणत्या कलमान्वये गुन्हा आहे

: (A) 181 (B) 183

(C) 180 (D) 190

प्रश्न क्र. 53 : कार बॅटरीमध्ये प्रयुक्त ॲसिड ............... आहे

: (A) हायड्रोक्लोरिक ॲसिड (B) बोरिक ॲसिड

(C) नायट्रीक ॲसिड (D) सल्फ्युरिकत ॲसिड

प्रश्न क्र.54 : ट्रॅफिक सिग्नलचा अंबर दिवा सारखा चालू बंद होत असतांना ......

: (A) वाहन थांबवा (B) वाहन हळू चालवा

(C) वाहन थांबवा, डावीकडे व उजवीकडे बघुन पुढे जा (D) वाहन पार्किंग करु नका

प्रश्न क्र.55 : गिअर बॉक्सचा उपयोग कशासाठी होतो

: (A) टॉर्क वाढविणे / कमी करणे (B) गती शुन्य करणे

(C) वाहन सुरु करणे (D) वाहन बंद करणे

प्रश्न क्र.56 : बॅटरीमध्ये ....... हा धातु असतो.

: (A) कॉपर (B) ॲल्युमिनियम

(C) पोलाद (D) स्टेनलेस स्टील

प्रश्न क्र.57 : इंजिन व गिअर बॉक्सचा संबंध जोडणे व तोडणे याकरिता वाहनास कोणते उपकरण असते.

: (A) प्रेशर शाफ्ट (B) डिफरिंनशियल

(C) क्लच (D) पॉवर स्टेअरिंग

प्रश्न क्र.58 : स्वयंचलित वाहनातून कोणता विषारी वायू बाहेर पडतो ?

: (A) कार्बन मोनाक्साईड (B) कार्बनडाय मोनाक्साईड

(C) मिथेन (D) यापैकी कोणताही नाही

प्रश्न क्र.59 : रेडिएटर चे काम कोणते ?

: (A) इंजिन थंड ठेवणे (B) ऑईल थंड ठेवणे

(C) गाडी थंड ठेवणे (D) कुलिंग वॉटर थंड करणे

प्रश्न क्र.60 : जिल्हाधिकारी यांच्या वाहनावर कोणत्या रंगाचा दिवा असतो ?

: (A) लाल (B) निळा

(C) हिरवा (D) अंबर

प्रश्न क्र.61 : स्पार्क प्लग हे कोणत्या वाहनामध्ये असतात ?

: (A) पेट्रोल वाहनामध्ये (B) डिझेल वाहनामध्ये

(C) दोन्ही वाहनामध्ये (D) यापैकी नाही



StudySite.org StudySite.org studysite.org

StudySite.org
StudySite.org

प्रश्न क्र.62 : चारचाकी व मोठ्या वाहनातील डिफरन्शीयल गीअर बॉक्सचे महत्वाचे कार्य कोणते आहे

: (A) वाहनांचा वेग वाढविणे (B) वाहनचा वेग कमी करणे

(C) वळणावर आतील व बाहेरील चाकांच्या गतीवर नियंत्रण ठेवणे (D) गाडी थांबविणे

प्रश्न क्र.63 : गाडीच्या चाकातील हवेचा दाब प्रमाणित दाबापेक्षा कमी असल्यास कोणते परिणाम उदभवतात

: (A) गाडीच्या टायरचे आयुष्यमान कमी होते (B) वाहनावरील नियंत्रण कमी होते

(C) इंधन खप वाढतो (D) वरीलपैकी सर्व

प्रश्न क्र.64 : गाडीच्या चाकापैकी एखाद्या चाकाची एकच बाजू जास्त झिजल्याचे निदर्शनास आल्यास खालीलपैकी काय कराल

(A) गाडीच्या सर्व चाकांची हवा प्रमाणित ठेवाल

(B) गाडीच्या चाकाच्या हबचे बेअरिंग बदलाल

(C) गाडीचे व्हील अलाईनमेंट करुन घ्याल

(D) यापैकी काही नाही

प्रश्न क्र.65 : पॅसेंजर कार (पाच आसनी) मध्ये कोणत्या दाबाची बॅटरी वापरतात ?

: (A) 6 व्होल्ट (B) 12 व्होल्ट

(C) 24 व्होल्ट (D) यापैकी नाही

प्रश्न क्र.66 : वाहनाचे प्रवास सुरु करण्यापूर्वीची धाव 88,406 कि.मी. होती. प्रवासपूर्ण झालेनंतर 89,066 कि.मी. झाली तसेच वाहनामध्ये पूर्वीचे शिल्लक इंधन 10 लि. होते. प्रवासदरम्यान 30 लि. इंधन घेतले व प्रवास संपल्यावर शिल्लक इंधन 7 लि. आहे, तर वाहनाची सरासरी काय ?

: (A) 21.5 (B) 20

(C) 21 (D) 19.5

प्रश्न क्र.67 : क्राऊन पिनीयन गाडीच्या कोणत्या भागामध्ये असते ?

: (A) गीअर बॉक्स (B) क्लच

(C) डिफरन्शीयल (D) इंजिन



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org

प्रश्न क्र.68 : सर्व प्रकारच्या रस्त्यावर वाहन उत्तम प्रकारे चालण्याकरिता वाहनामध्ये खालील पैकी कोणती प्रणाली असणे आवश्यक आहे ?

: (A) टर्बोचार्जर (B) फोरव्हिल ड्राईव्ह
(C) पॉवर स्टेअरिंग (D) पॉवर ड्राईव्ह

प्रश्न क्र.69 : MH-38 वाहन कोणत्या जिल्ह्यातून नोंदणीकृत आहे

: (A) अकोला (B) हिंगोली
(C) वाशिम (D) जळगांव

प्रश्न क्र.70 : मुंबई-आग्रा या राष्ट्रीय महामार्गाचा क्रमांक कोणता ?

: (A) NH-3 (B) NH-4
(C) NH-17 (D) NH-5

प्रश्न क्र.71 : सुरक्षित वहातुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या रस्त्यावरील रहदारीची चिन्हे किती प्रकारात विभागलेली आहेत

: (A) 4 (B) 3
(C) 2 (D) 5

प्रश्न क्र.72 : वाहन डावीकडे किंवा उजवीकडे वळवावयाचे असेल तर अगोदर किती अंतरावर सिग्नल द्यावा

: (A) 50 फुट (B) 100 फुट
(C) 500 फुट (D) 1000 फुट

प्रश्न क्र.73 : तुमच्या पुढील शाळेच्या वाहनाने लाल सिग्नल दिला असता ......

: (A) तुम्ही मागे 10 फुटावर थांबाल (B) तुम्ही मागे 20 फुटावर थांबाल
(C) जागच्या जागी थांबाल (D) गाडीचा वेग कमी करुन पुढे जाल

प्रश्न क्र.74 : वाहन चालवत असतांना तुम्हाला त्वरीत थांबायचे असेल तर हाताने अचुक सिग्नल कसा द्याल

: (A) उजव्या हाताने बोट जमिनीकडे दर्शवाल (B) उजवा हात वर करुन तळवा समोरील बाजुस राहील
(C) सिग्नलची आवश्यकता नाही (D) हॉर्न द्याल

प्रश्न क्र.75 : रस्त्यावरील दोन्ही कडेच्या लाईनस जर रस्त्याच्या मध्यभागाकडे कमी होत जात असतील तर काय दर्शवितात

: (A) फक्त छोट्या मोटार कारच जाव्यात (B) पुढे फुटपाथ आहे
(C) पुढे रस्ता अरुंद होत आहे (D) पुढे रस्ता संपत आहे



StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org

- कच्चे टिपणासाठी जागा -

StudySite.org



StudySite.org
StudySite.org

StudySite.org
StudySite.org

- कच्चे टिपणासाठी जागा -

StudySite.org



StudySite.org
StudySite.org